**<u>रे.दि.मु.क्र. १५७/२०१४ मधील निशाणी ४१ वरील आदेश</u>**

(दिनांक १८/०३/२०२१)

१. अर्ज व म्हणणे वाचले. प्रतिवादी व वादी तर्फे विधीज्ञांचे युक्तीवाद ऐकले. अभिलेखावरील दस्तऐवज पाहिले.

२. सदर कामी मागील तारखेस वादीतर्फे साक्षीदार माणिक विठ्ठल पाटील यांचा उलट तपास घेणेवर प्रकरण असता प्रतिवादी यांचे वकील यांना त्यांच्या वैयक्तीक अडचणीमुळे वेळेत कोर्टात हजर राहता आले नाही. त्यामुळे त्यांच्याविरुध्द उलट तपास नाहीचे आदेश झालेले आहेत. वास्तवीक सदरचा आदेश झालेनंतर प्रतिवादी यांचे वकिल कोर्टात आले अशा परिस्थितीत सदरचा उलट तपास नाहीचा आदेश झालेला आहे. प्रतिवादी यांना सदरची केस गुणदोषावर चालवणेची इच्छा आहे. प्रतिवादी हे वादीच्या साक्षीदाराचा उलट तपास घेणेस तयार आहेत. त्यामुळे त्यांच्या विरुध्द उलट तपास नाही असा झालेला आदेश रद्द करुन प्रतिवादी याना उलटतपास घेण्यास परवानगी मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

२. प्रस्तुत अर्जास वादी यांनी म्हणणे दाखल करुन हरकत घेतलेली आहे व अर्ज कोणत्याही संयुक्तीक कारणाशिवाय दाखल केलेला आहे. सबब अर्ज नामंजुर करणेची विनंती केली अगर तो मंजुर करणेचा झाल्यास प्रतिवादीना खर्च बसवणेची विनंती केली.

३. प्रकरण पाहिले. प्रकरणातील वस्तुस्थिती विचारात घेता, प्रतिवादी याना वादीतर्फे साक्षीदाराचा उलट तपास घेण्याची परवानगी नाकारल्यास त्याचे अपरिमित नुकसान होणार आहे. याउलट, प्रस्तुतचा अर्ज मंजूर केल्यास व

प्रतिवादीतर्फे वादीसाक्षीदाराचा उलटतपास अभिलेखावर नोंदवल्यास प्रकरण गुणावगुणावरती चालुन निकाली होण्यास मदतच होणार आहे. प्रतिवादीतर्फे उलट तपास घेण्यास जो विलंब झाला आहे त्याबाबत प्रतिवादीवर खर्च बसवणे योग्य होईल. सबब, पुढीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे;

# आ दे श

१. प्रतिवादी यांनी वादीस रक्कम रु. २००/- खर्च देण्याच्या अटीवर अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी यांच्याविरुध्द उलट तपास नाही असा झालेला आदेश रद्द करण्यात येत आहे व प्रतिवादीला वादी साक्षीदाराचा उलटतपास घेण्याची परवानगी देण्यात येते.

३. पुढील तारखेस वादीने त्याचे साक्षीदार माणिक विठ्ठल पाटील यांना न्यायालयात सकाळी ११.०० वाजता उलटतपासासाठी हजर ठेवावे व प्रतिवादी यानी न चुकता वादी साक्षीदाराचा उलट तपास पुर्ण करणेचा आहे. तसे करण्यास प्रतिवादी चुकल्यास अर्ज वेगळ्या आदेशाशिवाय रद्द समजण्यात येईल.

Bhushan Ramesh Thakur
Digitally signed by Bhushan Ramesh Thakur
Date: 2021.03.18 17:49:30 +0530

(भूषण र. ठाकूर)

दिनांकः- १८/०३/२०२१

सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
इस्लामपूर.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file order/Judgment are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Shri. Pradip T. Patil |
| Court | : | Jt. Civil Court Sr.Dn.Islampur |
| Date of Order/Judgment | : | 18/03/2021 |
| Typed on | : | 18/03/2021 |
| Signed by P.O. on | : | 18/03/2021 |
| Uploaded on | : | 18/03/2021 |